# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र. १६१/२०२४

**विषय : सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था आणि प्राध्यापक यांची बँक खातेविषयक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत...**

**संदर्भ : १. वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्र. ३४१/२०२१ दिनांक २४/११/२०२१.**
**२. वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्र. ३३६/२०२२ दिनांक २१/११/२०२२.**

उपरोक्त विषय व संदर्भिय परिपत्रकांअन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था आणि प्राध्यापक यांची बँक खातेविषयक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि अद्यापपर्यंत काही महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापकांनी **बँकखातेविषय माहीती आणि बँकखातेविषय केवायसी** अद्ययावत न केल्यामुळे महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापकांच्या खात्यांमध्ये रक्कम वर्ग केलेल्या रकमा विद्यापीठ बँक खात्यामध्ये परत जमा होत आहेत. त्यामुळे सदर रकमा महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापकांना परत पाठविण्याकरिता NEFT/RTGS चा वापर करणे अडचणीचे होत आहे.

महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापकांना कळविण्यात येते की, परिक्षा व मूल्यमापन मंडळ, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना आणि गुणवत्ता सुधार योजना इत्यादी अशी आपली सर्व बँकविषयक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (BOD Login) अद्यायावत करण्यात यावी. तसेच, **ज्या महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापकांनी बँकखातेविषय केवायसी पूर्ण केलेली नाही त्यांनी ती बँकेतून करुन घ्यावी, जेणेकरुन रकमा विद्यापीठ खात्यामध्ये परत येणार नाहीत.**

सबब, जी महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापक बँक खातेविषयक माहिती अद्ययावत करणार नाहीत किंवा संबंधितांच्या बँक खात्यांमध्ये रक्कम वर्ग करण्याकरिता त्रुटी आढळल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापक यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे-४११ ००७.
**जा.क्र.:** वित्त/२०२४-२५/३३९
**दिनांक :** २३/०७/२०२३

सीएमए (डॉ.) चारुशीला गायके
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
२. मा. संचालक, विद्यापीठाशी संलग्नित मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था
३. मा. संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ
४. मा. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ
५. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

आपणांस विनंती की, सदर परिपत्रक सर्वांच्या निदर्शनास आणावे.